# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक ०२/१२/२०१७

## मा. पालकमंत्री यांची शहीद कुटुंबीयांच्या घरी भेट

दिनांक २४/११/२०१७ रोजी मौजा कोटगुल येथे झालेल्या आयईडी स्फोटामध्ये शहीद झालेल्या जवान पोहवा/२७२ सुरेश गावडे यांच्या कुटुंबीयांची आज जिल्हयाचे पालकमंत्री मा. राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी भेट घेतली.

शासन नेहमी शहीद कुटुंबीयांच्या पाठीशी आहे तसेच त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी दिली तसेच यावेळी शहीद कुटूंबियांना पालकमंत्री महोदयांच्या हस्ते धनादेशही देण्यात आला. यावेळी गडचिरोली परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री. अंकुश शिंदे, पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी व अपर पोलीस अधिक्षक महेंद्र पंडीत हे उपस्थित होतें.

